महाराष्ट्र शासन
## छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर
शेंडा पार्क, कोल्हापूर- ४१६०१३

| दुरध्वनी :- ०२३१ - २६४१५८३ | फॅक्स क्र. ०२३१-२६४४३६९ | Email - est12cprh@gmail.com |
|---|---|---|

जा.क्र.छप्रासरुको/ आस्था-१-२/४७४ /२०२६ दिनांक - २७/०१/२०२६

## बायोमेडिकल इंजिनियर (Bio Medical Engineer) पदभरतीची जाहिरात

छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय,कोल्हापूर येथील सर्व यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीच्या देखभाल व दुरुस्ती करिता संस्थास्तरावर बायोमेडिकल इंजिनियर (**Bio Medical Engineer**) **यांचे १ पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात** कंत्राटी पध्दतीने (१२० दिवस) नियुक्तीने भरण्यासाठी दि.२७/०१/२०२६ पासून दि.०५/०२/२०२६ रोजी सायं.०५.०० वा. पर्यत सार्वजनिक व साप्ताहिक सुट्टी वगळता अर्ज मागविण्यात येत आहेत. दि.०५/०२/२०२६ रोजी सायं.०५.०० नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही. (पोस्ट किंवा कुरीयर कंपनी यांच्याकडून विलंबाने प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्या करीता हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.)

| अ.क्र | पदाचे नाव | पदसंख्या | वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मासिक ठोक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | बायोमेडिकल इंजिनियर | ०१ | खुला प्रवर्ग-३८ वय<br>मागास प्रवर्ग-४३ वय | बायोमेडिकल इंजिनियरिंग (Bio Medical Engineering) शाखेची मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी/पदव्यूत्तर पदवी. | २५,०००/- |

**अटी व शर्ती**

०१ अर्जदाराने जाहिरातीत नमुद केलेली किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

०२ कामाचा अनुभव असल्यास त्याची सविस्तर माहिती आणि त्यासंबधीचे प्रमाणपत्रे सदर अर्जासोबत जोडण्यात यावीत, सदर अनुभव प्रमाणपत्रामध्ये आपण केलेल्या कामाचा, विशेष कौशल्याचा (उदा. व्हेंटीलेटर दुरुस्ती, ऑक्सिजन प्लांट व्यवस्थापन, मॉनिटर व इतर वैद्यकीय उपकरणे आणि यंत्रसामुग्री दुरुस्ती इ.) व कार्यक्षमतेबावतचा तपशिल नमुद असणे आवश्यक आहे.

०३ निवडीप्रक्रियेच्या निकशामध्ये खालील प्रमाणे समावेश करण्यात येईल.
- अ) ऑक्सिजन एल.एम.ओ. टॅंक, व्हेंटीलेटर, पी.एस.ए. सिस्टीम, एम.जी.पी.एस. सिस्टीम हाताळणी व दुरुस्तीचा नुभव असणा-या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
- ब) प्रत्येक ०६ महिन्याच्या अनुभवासाठी ०१ गुण देण्यात येईल.
- क) शैक्षणिक आर्हता पुर्ण करण्यासाठी घेतलेल्या दुस-या प्रयत्नापासून प्रत्येक प्रयत्नासाठी ०३ गुण कमी करण्यात येतील

०४ सदरची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या आणि कंत्राटी स्वरुपात असून कोविड-१९(एच१ एन१) या रोगाचा प्रादुर्भाव असेपर्यत किंवा १२० दिवस या पैकी जे आधी असेल या कालावधी पुरतीच राहील.

०५ सदरील पदावरील तात्पुरत्या/कंत्राटी स्वरुपात नियुक्ती झालेल्या उमेदवारास भविष्यात सदरील जागेवर कायमस्वरुपी नेमणूकीचा कोणताही हक्क राहणार नाही.तश्या अर्थाचे नोटराईज प्रमाणपत्र १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर उमेदवाराने नियुक्ती स्विकारताना देणे आवश्यक राहिल.

०६ सदर पदासाठी अधिक प्रमाणात अर्ज आल्यास मुलाखतीसाठी निवड करताना उमेदवारांची पदवी/पदव्यूत्तर पदवी यामधील मिळालेले गुण आणि त्यांच्या कामाचा अनुभव याच्या आधारे निवडयादी तयार करण्यात येईल. याबावत उमेदवारांनी कोणत्याही प्रकारच्या दबावतत्रांचा/शिफारसपत्रांचा वापर केल्यास सदर उमेदवारांचा निवडीसाठी विचार करण्यात येणार नाही.

०७ नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवारास सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त अन्य कोणतीही रजा अनुज्ञेय असणार नाही तसेच त्यांनी त्यांच्या कार्यालयीन वेळेनंतर तसेच आवश्यकता भासल्यास त्यांनी सुट्टीच्या दिवशी/कार्यालयीन वेळेनंतर (रात्री सुध्दा) अकस्मित स्वरुपाच्या कामकाजासाठी उपलब्ध असले पाहीजे.

०८ अर्जदाराने सदर पदासाठी अर्ज करतेवेळी सदर अर्ज साध्या कागदावर करुन सदर अर्जासोबत खालील कागपत्राच्या साक्षांकित छायाकित प्रती जोडाव्यात.

१) १० वी उर्तीण गुणपत्रक व प्रमाणपत्र,

२) बायोमेडीकल इंजिनियरींग या विषयातील पदवी/पदव्यत्तर पदवी उतीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र आणि प्रयत्न प्रमाणपत्र (अटेम्ट प्रमाणपत्र),

३) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र,

४) सक्षम प्राधिकाऱ्याकडून दिलेले जात आणि जात वैद्यता प्रमाणपत्र.

५) अनुभव प्रमाणपत्र,

६) उमेदवारास संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

७) आधार कार्ड,पॅनकार्ड सोवत जोडणे आवश्यक आहे.

८) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असावा,तशा प्रकारचे नोंदणीकृत वैद्यकिय व्यावसायिकाचे (RMP) वैद्यकिय प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अर्जदाराविरुध्द कोणत्याही फोजदारी गुन्हा दाखल झालेला नसल्याचे स्वयम घोषणापत्र सोबत जोडण्यात यावे.

०९ सदर पदाकरीता मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुलाखत दि.१०/०२/२०२६ रोजी दु.०३:३० वाजता अधिष्ठाता कार्यालय, शेंडापार्क, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर येथे नियोजित करण्यात येईल.

१० उमेदवारास मुलाखतीला उपस्थित राहण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च अथवा दैनदिन भत्ता देण्यात येणार नाही.

११ नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराचे काम समाधानकारक नसल्यास त्याची नियुक्ती कोणतीही पुर्व सुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१२ नियक्त होणा-या बायोमेडिकल इंजिनियर (**Bio Medical Engineer**) यांनी वैद्यकीय अधिक्षक, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर यांचे अधिनस्त कर्तव्ये पार पाडणेची आहेत.

१३ नियुक्ती प्रक्रियेसाठी खालील प्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात आले.

| | |
|---|---|
| १) जाहिरात प्रसिध्द करणे | : दि.२७/०१/२०२६ |
| २) अर्ज सादर करण्याची मुदत | : दि.२७/०१/२०२६ ते दि.०५/०२/२०२६ सायं.०५.०० वा. पर्यंत |
| ३) अर्ज छानननी | : दि.०६/०२/२०२६ |
| ४) मुलाखत दि. | : दि.१०/०२/२०२६ रोजी दु.०३.३० वा. |
| ५) मुलाखतीचे ठिकाण | : अधिष्ठाता कार्यालय, शेंडापार्क, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचा रुग्णालय, कोल्हापूर |

१४ उमेदवाराचा निवडीबाबतचे व उपरोक्त वेळापत्रकामध्ये बदल करण्याचे किंवा रद्द करण्या बाबतचे सर्व हक्क मा.अधिष्ठाता, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय,कोल्हापूर यांना राखून ठेवले आहेत.

(डॉ. सदानंद भिसे)
अधिष्ठाता,
छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचाररुगणालय,कोल्हापूर.

प्रत माहितीसाठी सादर :-

१) सर्व प्राध्यापक व विभाग प्रमुख, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय,कोल्हापूर

२) वैद्यकीय अधिक्षक, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर.

३) आयुक्त संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई

४) सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी व द्रव्ये विभाग, मंत्रालय मुंबई

५) नोटीस बोर्ड, मा अधिष्ठाता कार्यालय, शेंडा पार्क, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर

६) संकेतस्थळ समिती अध्यक्ष, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर.

७) कार्यालयीन निवड नस्ती,